# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 2262 0601, 2269 0602, 2264 1150/51, 30333447फॅक्स - 2269 2102.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**जाहीर सूचना**
**मान्यताप्राप्त नसलेल्या विद्यापीठ**
**अथवा अनधिकृत संस्थाबाबत**

क्रमांक: 2अ/एडीएम/अनधिकृतसंस्था/2013/ 307
दिनांक :10.6.2013

**मान्यताप्राप्त नसलेल्या विद्यापीठ/अनधिकृत संस्थांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी , पदव्युत्तर पदविका ( Diploma, UG Degree, PG Degree,PG Diploma )व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेणेबाबत.**

या संचालनालयाच्या मार्फत अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका व पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्मसी व एम.ई./एम.टेक. या पदव्युत्तर पदवी इत्यादी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. या व्यावसायिक अभ्यासक्रमांना, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया/ कौन्सील ऑफ आर्कीटेक्चर/ विदयापीठ अनुदान आयोग इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने संचालनालयाच्या **www.dte.org.in या संकेत स्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविले जाणारे अधिकृत अभ्यासक्रमांची यादी/ माहिती उपलब्ध आहे.**

वरील नमूद व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया/ कौन्सील ऑफ आर्कीटेक्चर/ विदयापीठ अनुदान आयोग इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासन यांचेकडून मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ /संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी अमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या तक्रारी या संचालनालयाकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची संलग्नता तपासून घ्यावी तसेच वर नमूद केल्याप्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा. उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील संस्था/ विद्यापीठाच्या मान्यतेबाबत या संचालनालयाशी अथवा संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

**सही/-**
(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई